शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्कारासाठी वेब ॲप्लिकेशन तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः शिछपु २०१६/प्र.क्र.२०१/१६/क्रीयुसे-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीखः ०५ मार्च, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक्र /राक्रीधो २०१२/ प्र.क्र.१५८/१२/ क्रीयुसे-२, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७
२) शासन ज्ञापन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक्र:- ईगव्ह-१५१७/ प्र.क्र.३६/ संगणक, दिनांक ०७ डिसेंबर, २०१७.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक्र: अनुवि ४९१७/३२/१७/ अर्थसंकल्प; दिनांक ०७ डिसेंबर, २०१७

प्रस्तावना

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्कारासाठी सुधरीत नियमावली निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार www.mumbaidivsports.com या वेबसाईट वर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर वेबसाईट मुंबई विभागाची असून यावर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्काराचे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. हा वेब ॲप्लिकेशन तयार करण्यासाठी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांच्याद्वारे दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यापैकी सर्वात कमी म्हणजेच रु.२.९५ लक्ष दरपत्रक असलेल्या मे.एज्युस्पोट्स एन्फोसर्व्हे, एल.एल. पी. ठाणे या संस्थेस हे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

क्रीडा विभागातील मुंबई विभागाच्या www.mumbaidivsports.com या वेबसाईट वर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य पुरस्कारासाठी हे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यासाठी मे.एज्युस्पोट्स एन्फोसर्व्हे, एल.एल. पी., ठाणे या संस्थेची निवड करण्यात येत आहे. यासाठी रु.२.९५ लक्ष (रुपये दोन लाख पंच्च्यान्नव हजार फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर रु.२.९५ लक्ष (रुपये दोन लाख पंच्च्यान्नव हजार फक्त) इतकी रक्कम मे.एज्युस्पोट्स एन्फोसर्व्हे, एल.एल. पी., ठाणे यांना धनादेशाद्वरे अदा करण्यात यावी.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र. ई-२, २२०२, सर्व साधारण शिक्षण, ८०, सर्व साधारण ८००, इतर खर्च पंचवार्षीक योजनांतर्गत योजना (०२) संकीर्ण (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H४५४)" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदी मधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.यासाठी संबंधित उपसंचालक / लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा)यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५११४३०७७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.05 11:44:15 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत).
७) सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत).
८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत)
९) वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे(क्रीडा संचालनालयामार्फत)
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
११) लेखाधिकारी, क्रिडा व युवक सेवा, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२) उप सचिव (क्रीडा)/ अवर सचिव (क्रीयुसे २ व ३) / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शा.शि.व क्री.वि., मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती, क्रीयुसे-२